# बँकेच्या ग्राहकांनी केंद्रीय योजनांचा लाभ घ्यावा




## रिझर्व्ह बँकेचे रिजनल डायरेक्टर शेंडे यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोला :** केंद्र सरकारने सर्वसामान्यांसाठी अगदी नगण्य किमतीत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना व अटल पेन्शन योजना उपलब्ध करून दिल्या आहेत. आर्थिक समावेशनाच्या माध्यमातून बँकिंग प्रवाहापासून दूर असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणून शेवटच्या घटकापर्यंत या योजनांचा लाभ पोहोचला पाहिजे, असे आवाहन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे नागपूरचे रिजनल डायरेक्टर सचिन शेंडे यांनी केले.

बोरगाव मंजू येथे ९ सप्टेंबर रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने अभियान राबविण्यात आले. यावेळी ते मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे (अध्यक्ष, जिल्हा बँक) म्हणाले की, जिल्ह्यात रि-केवायसीचे प्रमाण फारच कमी असल्याने आरबीआय व जिल्हा बँकेकडून संयुक्तपणे हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लोकांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. यावेळी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे रिजनल मॅनेजर पंकजकुमार, जिल्ह्याचे अग्रणी बँकेचे व्यवस्थापक नयन सिन्हा, नाबार्डचे जिल्हा प्रबंधक श्रीराम वाघमारे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, सहायक व्यवस्थापक प्रसन्ना बोंथा यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाला ग्राहक, खातेदार, शेतकरी उपस्थित होते.